**घोषणा**

प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ या पदाकरीता आयोगाकडून जाहिरात क्र. ७३/२०१५, दिनांक १५/०७/२०१५ व जाहिरात क्र. ९/२०१६ दिनांक २६/०२/२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. तदनंतर सदर दोन्ही जाहिरातींच्या संदर्भात दिनांक ०५/०७/२०१६ रोजी शुध्दीपत्रक व दिनांक ६ मे २०१७ रोजी घोषणा प्रसिध्द करण्यात आली आहे.

संबधीत जाहिरातीमध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रस्तुत पदांकरीता आवश्यक असलेल्या एकुण १० वर्षाच्या अनुभवापैकी ३ वर्षाचा अनुभव Head of Department or equivalent या स्तरावरील आवश्यक आहे.

यासंदर्भात शासनाने दिनांक २/११/२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार सदर पदाकरीता प्रशासकीय पदावर प्रत्यक्षात काम केल्याचा अनुभव असणे अपेक्षित आहे. त्यानुसार प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, अधिव्याख्याता (Selection Grade) या पदावर कार्यरत असलेल्या उमेदवारांकडे प्रत्यक्षात ३ वर्षाचा प्रशासकीय कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

तरी, उमेदवाराकडे एकुण १० वर्षाच्या अनुभवापैकी प्रत्यक्षात ३ वर्षाचा प्रशासकीय कामाचा अनुभव असल्याबाबत संबंधित संस्थेच्या सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्र मुलाखतीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील. याची संबंधीतांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक०५जुलै,२०१७

श्रीधर पाठक
उप सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग